# मुंबई विद्यापीठ

क्र. संलग्नता/आय.सी.सी./२०१७–१८/९

## परिपत्रक

विषयः– बी.एड., एम.एड., बी.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रम प्रथम वर्ष २०१७–१८ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयांच्या नाव नोंदणीबाबत.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे–१, यांनी पाठविलेल्या क्र. उशिसं/विधी/कॅप/प्र.क्र. ०१–२०१७/सीईटीसेला ६४६८ दिनांक ३१ मे, २०१७ परिपत्रकास अनुसरून शासकीय/अशासकीय अनुदानित/अशासकीय अनुदानित अल्पसंख्यांक/विद्यापीठ संचलित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित अल्पसंख्याक/कायम विना अनुदानित तत्वावर सुरू असणाऱ्या बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष सन २०१७–१८ करिताच्या प्रवेशासाठीची केंद्रीभूत प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेद्वारे लवकरच सुरू करण्यात येत आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सन २०१७–१८ मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांनी http://dhe.mhpravesh.in या संकेतस्थळावर महाविद्यालयांची ऑनलाईन नाव नोंदणी करावी. महाविद्यालयांनी अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्रपणे नाव नोंदणी करणे आवश्यक राहील. **केंदीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग घेवू इच्छिणाऱ्या महाविद्यालयांनी आवश्यक माहिती अचूकपणे दि. ०८.०६.२०१७ ते दि.१५.०६.२०१७ या कालावधीमध्ये उपरोक्त संकेतस्थळावर भरावयाचे आहे.**

उपरोक्त नमूद संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेनंतर त्यासोबत अर्जामध्ये नमूद केलेले सहपत्रे/मान्यता पत्रे जोडण्यात यावीत.

महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक व फॉर्म आपल्या माहितीसाठी सोबत जोडत आहे.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक–०९ जून,२०१७.